तातडीचे /समयमर्यादा/ महत्वाचे

राज्यकर उपआयुक्त (प्रशिक्षण) यांचे कार्यालय,
सी विंग, ७वा मजला, वस्तू व सेवाकर भवन,
माझगांव, मुंबई-४०००१०.
दूरध्वनी क्र :-२३७६०७२५

राउआ (प्रशिक्षण)/ विभाप-२०१५(२)/लिपिक,रा.नि.भाग१ व २/ आस्था-१८/ ब- 580 मुंबई, दिनांक- 02/08/17

परिपत्रक

विषय:- लिपिक -टंकलेखक, रा.नि.भाग १ व २ व सरळसेवेने आलेले यांच्यासाठी विहीत केलेल्या एकीकृत विभागीय परीक्षेच्या नियमानुसार डिसेंबर- २०१५(२)ची घेण्यात येणारी आगामी विभागीय परीक्षा माहे सप्टेंबर २०१७

संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक विउआ (प्रशिक्षण)/ विभाप२०१५(२)/लिपिक,रा.नि. भाग-१ व २/प्र.धा.१ / आस्था-१८/ ब- ४७६ मुंबई, दिनांक-१४.०६.२०१७

संदर्भाधिन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे लिपिक टंकलेखक यांच्याकरिता लिपीक-टंकलेखक व राज्यकर निरिक्षक भाग-१ परीक्षा माहे डिसेंबर २०१५(२) या सदराखाली आणि राज्यकर निरीक्षक यांच्याकरिता रा.नि. भाग-१ /२ माहे डिसेंबर २०१५(२) विभागीय परीक्षा स्वतंत्रपणे आयोजित करण्याविषयी प्रस्तुत केले होते. त्यानुसार लिपिक टंकलेखक- यांच्याकरिता लिपीक-टंकलेखक व राज्यकर निरिक्षक भाग-१ परीक्षा माहे डिसेंबर २०१५(२) तसेच राज्यकर निरीक्षक यांच्या करिता राज्यकर निरीक्षक भाग-१ /२ माहे डिसेंबर २०१५(२) खालीलप्रमाणे परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

१.लिपीक-टंकलेखक व राज्यकर निरीक्षक - भाग-१ दिनांक १२/०९/२०१७ ते १४/०९/२०१७ (पहिले सत्र)
२. राज्यकर निरीक्षक भाग - भाग-२ दिनांक १२/०९/२०१७ ते १४/०९/२०१७ (दुसरे सत्र)

**परिक्षेचे वेळापत्रक परिशिष्ट -१ मध्ये अंतर्भुत आहे.**
**परिक्षेचे अभ्यासक्रम परिशिष्ट - ड मध्ये अंतर्भुत आहे.**

लिपीक-टंकलेखक / राज्यकर निरीक्षक भाग-१ यांच्या करिता **पेपर क्रमांक ३ हा २ तासांचा** असून वस्तू निष्ठ स्वरुपाचा (objectiv type) ६० गुणांचा राहील व उर्वरित ४० गुणांचा पेपर हा प्रात्याक्षिक (practical) स्वरुपाचा राहील. प्रात्यक्षिक परीक्षेचा दिनांक नंतर कळविण्यात येईल

सदर परीक्षेस आवेदनपत्रे सादर करण्यात आलेल्या व पात्र असणाऱ्या उमेदवारांना तसेच परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात आलेल्या उमेदवारांच्या याद्या लवकरच प्रसारित करण्यात येतील

तसेच सदर परिक्षा **मुंबई, पुणे व नागपूर या तीन प्रमुख केंद्रावर आयोजित** करण्यात येणार असून परिक्षार्थींची केंद्रनिहाय संख्या व याद्या लवकरच प्रसारित करण्यात येतील.

मुंबई माझगाव व वांद्रे या विभागातील कर्मचाऱ्यांसाठी तसेच ठाणे विभागातील रायगड, अलिबाग, ठाणे शहर व ठाणे ग्रामीण उमेदवारांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे परिक्षा दालन, ९ वा मजला, जुनी इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव , मुंबई हे केंद्र निश्चित करण्यात आले आहे याची कृपया नोंद घ्यावी.

पुणे विभागातील उमेदवारांकरिता तसेच कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, धुळे, औरंगाबाद यांच्या करिता पुणे विभाग परिक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहे. तसेच नागपूर, नांदेड व अमरावती विभागातील कर्मचाऱ्याकरिता नागपूर विभाग परिक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहे.

याद्या प्रस्तुत होण्यापुर्वी जर एखाद्या परिक्षार्थीस केंद्र बदलून हवे असल्यास हे परिपत्रक प्रसारित होताच लेखी कळवावे. याद्या प्रसारित झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत केंद्र बदलून मिळणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी.

**लिपिक-टंकलेखक व राज्यकर निरीक्षक भाग-१ व भाग-२ विभागीय परिक्षेसाठी पुस्तके वितरणाबाबत:-**

वरील विभागीय परिक्षेकरिता विहीत पुस्तकांचे वितरण करण्यात येईल. परिक्षार्थींना एकदा पुस्तके दिल्यावर जर त्यांनी पुस्तके आणली नाहीत, तर त्यांना परिक्षा कक्षात पुन्हा पुस्तके दिली जाणार नाहीत. त्याची सर्वस्व जबाबदारी परिक्षार्थींची राहील.

राज्यकर निरीक्षक भाग-२ करिता पेपर क्रमांक ५ मुल्यवर्धित कर कायद्याच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका या विषयाची मराठी तसेच इंग्रजी पुस्तिका उपलब्ध करुन देण्याबाबत या कार्यालयाच्या पत्र क्रमांक ब-१८० दिनांक ०६/०३/२०१२ अन्वये कार्यालय प्रमुखांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

**पुस्तके वितरणाची वेळ सकाळी ११.०० ते ४.०० राहील.**

मुंबई केंद्राकरिता राज्यकर निरिक्षक भाग-१ व भाग-२ विभागीय परिक्षेकरिता दिनांक १६/०८ /२०१७ पासून पुस्तके वितरीत करण्यात येतील. तसेच सर्व परिक्षार्थींच्या आसन क्रमांकाची यादी व ओळखपत्राचा नमुना लवकरच प्रसारित करण्यात येईल.

**विक्रीकर निरिक्षक भाग-१ व भाग-२** करिता परिक्षापूर्व प्रशिक्षण दिनांक २९/०८/२०१७ ते दिनांक ३१/०८/२०१७ या कालावधीत समिती सभागृह , ७ वा मजला , वस्तू व सेवाकर भवन, नवीन इमारत , माझगांव येथे मुंबई केंद्रातील उमेदवारांकरिता देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच मुंबई बाहेरील उमेदवारांसाठी पुणे व नागपूर केंद्राने आयोजित केल्याप्रमाणे प्रशिक्षण देण्यात येईल.

टीप :- एखादया राज्यकर निरिक्षकाचे आवेदन पत्र सादर करणे राहून गेले असल्यास हे परिपत्रक प्रस्तृत झाल्याच्या दिनांकानंतर एका आठवडयात सादर करावे. अन्यथा उशिरा येणाऱ्या आवेदनपत्राचा विचार केला जाणार नाही.

मा. विशेष राज्यकर आयुक्त यांच्या मान्यतेने.

(माधवी सुर्यवंशी)
राज्यकर उपायुक्त (प्रशिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीसाठी सादर :-

१. मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. विशेष राज्यकर आयुक्त , महाराष्ट्र राज्य , मुंबई.
३. सर्व क्षेत्रीय अपर विक्रीकर आयुक्त, मुंबई.

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर/ रवाना :-

१. सर्व राज्यकर सहआयुक्त, सर्व राज्यकर उप आयुक्त (प्रशासन) ,सर्व सहाय्यक राज्यकर आयुक्त (प्रशासन) यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांच्या निर्दशनास आणून त्याची नोंद आपल्या अभिलेखावर ठेवण्यात यावी.
२. आस्थापना अधिकारी, राज्यकर आयुक्त व अपर राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय.
३. प्रबंधक, महाराष्ट्र राज्यकर न्यायाधिकरण, मुंबई.
४. राज्यकर उप आयुक्त (जनसंपर्क), सुरक्षा अधिकारी, माझगांव कार्यालय व बांद्रा कार्यालय, राज्यकर खाते, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. सुरक्षा अधिकारी, माझगांव कार्यालय, व वांद्रे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. राज्यकर सहआयुक्त(महाविकास) महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांना विनंती करण्यात येते की सदर परिपत्रक संकेत स्थळावर प्रदर्शित करावे.
७. स्थळप्रत.

# परिशिष्ठ १

## अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या विभागीय परिक्षा, डिसेंबर - २०१५(२)

## वेळापत्रक

### १. लिपिक व विक्रीकर निरिक्षक भाग-१ ची विभागीय परिक्षा

| वार व दिनांक | वेळ | पेपर क्र. | विषय |
|---|---|---|---|
| मंगळवार<br>१२/०९/२०१७ | सकाळी<br>१०.३० ते १.३० | १ | विभागाकडून अंमलबजावणी करण्यात येणारे कर कायदे व नियम (पुस्तकाशिवाय) |
| बुधवार<br>१३/०९/२०१७ | सकाळी<br>१०.३० ते १.३० | २ | महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१(पुस्तकांसह) |
| गुरुवार<br>१४/०९/२०१७ | सकाळी<br>१०.३० ते १२.३० | ३ | संगणक व विभागाने अंगीकृत केलेली ऑटोमेशन पध्दती-थियरी आणि प्रॅक्टीकल्स(पुस्तकाशिवाय) |

### २. विक्रीकर निरिक्षक भाग-२ ची विभागीय परिक्षा

| वार व दिनांक | वेळ | पेपर क्र. | विषय |
|---|---|---|---|
| मंगळवार<br>१२/०९/२०१७ | सकाळी<br>२.३० ते ५.३० | ४ | वाणिज्य लेखे व वाणिज्य संघटन (पुस्तकाशिवाय) |
| बुधवार<br>१३/०९/२०१७ | सकाळी<br>२.३० ते ५.३० | ५ | मुल्यवर्धित करकायदयाच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका (पुस्तकांसह) |
| गुरुवार<br>१४/०९/२०१७ | सकाळी<br>२.३० ते ५.३० | ६ | वाणिज्य कायदा व न्यायालयीन बाबी (पुस्तकांसह) |

## परिशिष्ट - अ ड

### विभागीय परीक्षेकरीता अभ्यासक्रम

भाग - १

| | | | |
|---|---|---|---|
| पेपर १ | विभागाकडून अंमलबजावणी करण्यात येणारे कर कायदे आणि नियम<br>अ. महाराष्ट्र मुल्यवर्धित करकायदा, २००२ आणि त्या अनुषंगाने बनविलेले नियम<br>ब. केंद्रिय विक्रीकर कायदा, १९५६ आणि त्या अनुषंगाने बनविलेले नियम<br>क. महाराष्ट्र व्यवसाय, व्यापार, अजिविका व नोकऱ्या यावरील करकायदा, १९७५ व त्या अनुषंगाने बनविले नियम<br>ड. महाराष्ट्र ऐषआराम सेवावरील करकायदा, १९८७ आणि त्या अनुषंगाने बनविलेले नियम | (पुस्तका शिवाय)<br>८० गुण<br>१० गुण<br>५ गुण<br>५ गुण | १०० गुण |
| पेपर २ | महाराष्ट्र नागरी सेवा नियम<br>महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९<br>महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१<br>महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयेतर सेवा इ...) नियम १९८१<br>महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१<br>महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन) नियम १९८२<br>महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४<br>मुंबई सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम ११९८ | (पुस्तका सहित) | १०० गुण |
| पेपर ३ | संगणक व विभागाने अंगिकृत केलेली ऑटोमेशन पध्दती - थिअरी आणि प्रॅक्टीस | (पुस्तका शिवाय) | १०० गुण |

भाग - २

| | | | |
|---|---|---|---|
| पेपर ४ | अ)वाणिज्य लेखे<br>१) अर्थ,उद्दीष्ट, उपयुक्तता व पुस्तपालनाचे उपयोग<br>२) पुस्तपालनाच्या द्विनोंद पध्दतीचे तत्वे<br>३) लेख्यांचे वर्गीकरण<br>४) रोजकिर्द<br>५) खतावनी<br>६) सहाय्यक लेखापुस्ते (रोजकिर्दचा उपविभाग)<br>७) रोखपुस्तक<br>८) अधिकोष मेळ पुस्तक<br>९) परीक्षासुची<br>ब) वाणिज्य संघटन<br>१) एकल व्यापारी संस्था<br>२) हिंदू अविभक्त कुटूंब संस्था<br>३) भागीदारी संस्था<br>वरील अ आणि ब करीता, महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाने इयत्ता अकरावी व बारावी च्या वाणिज्य शाखेकरीता विहित केलेल्या अभ्यासक्रमावर प्रश्न विचारण्यात येतील. | (पुस्तका शिवाय) | १०० गुण |

| | | | |
|---|---|---|---|
| पेपर ५ | मुल्यवर्धित कर कायद्याच्या कार्यपद्धतीची नियम पुस्तिका<br>१. नोंदणी<br>२. विवरण<br>३. परतावा<br>४. वसुली<br>५. लेखापरिक्षण | (पुस्तका सहित) | १०० गुण |
| पेपर ६ | <u>वाणिज्य कायदा आणि न्यायालयीन बाबी</u><br>भारतीय पुरावा कायदा, १८७२<br>प्रकरण I (कलम- ४), प्रकरण II (कलम - ५ ते १६,३१ ते ३४,३९), प्रकरण III (कलम ५६,५७,५८), V ( कलम ६१ ते ६७) , प्रकरण VII (कलम १०१ ते १०६) आणि प्रकरण VIII (कलम ११५,११६,११७)<br><u>वाणिज्य कायदा</u><br>भारतीय माल विक्रीय कायदा, १९३०<br>भारतीय करार कायदा, १८७२<br>प्रकरण I ( कलम ३,५ आणि ८), II (कलम १०,११,१३ ते १८, २२ ते २५ आणि २७), IV (कलम ३७ ते ४०,४६ आणि ४७) आणि X (कलम १८२ ते १८८,२११,२१३ आणि २१४) | (पुस्तका सहित) | १०० गुण |